**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८९ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. दत्तात्रय मणेप्पा मुलगे<br>द्वारा उप विभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विकास उपविभाग, क्र.४, पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक अधीक्षक अभियंता,<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ कार्यालय, पुणे-१ | हजर |

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय मणेप्पा मुलगे यांनी श्री. आर. आर. जगताप, कक्ष अधिकारी (आ.५) व श्री. एस.पी. भातखंडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई यांच्या अनुक्रमे दि. ६.१२.२००६ व दि. ५.१२.२००६ च्या पत्राच्या अनुषंगाने एकूण पाच मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे यांच्याकडे मागितली होती.

वरील तीनही घटकांमधील चर्चेत उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले. माहिती मिळाली असल्याचे व तक्रार नसल्याचे अपीलकर्त्याने निवेदनात नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३१.७.२००८**

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संदिप बबनराव गायकवाड
मु.पो.तरडगाव, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, फलटण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत तरडगाव, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९ / सातारा /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संदिप बबनराव गायकवाड
मु.पो.तरडगाव, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, फलटण, जि.सातारा श्री.ए.एस.घुले

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत तरडगाव, ता.फलटण, जि.सातारा श्री.दामाजी बाजीराव चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.१.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>यशवंत ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत सन २००५-२००६ मध्ये मौजे तरडगाव येथे सार्वर्जानक शौचालय संदर्भात. योजनेतील जागेसंदर्भात बक्षीस अथवा कोणत्या रुपाने उपलब्ध झाली. सार्वजनिक शौचालयासंदर्भात केलेल्या बक्षीसपत्रांची नक्कल मिळण्याबाबत. |

## विवेचन

यशवंत ग्राम समृध्दी योजनेअंतर्गत तरडगाव, ता.फलटण येथे सार्वजनिक शौचालयासाठी घेतलेल्या जागेच्या बक्षीसपत्राची नक्कल व अन्य माहिती दि.२.८.२००६ च्या अर्जान्वये अपीलकर्ता श्री.संदिप बबनराव गायकवाड यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण, जि.सातारा यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.७.९.२००६ रोजी श्री.गायकवाड यांना 'माहिती तयार असून शुल्क भरावे,' असे कळविले व दि.८.९.२००६ रोजी माहिती दिली. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार ३० दिवसांच्या विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यानी माहिती न दिल्यामुळे श्री.गायकवाड यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण, जि.सातारा यांच्याकडे दि.७.९.२००६ रोजी अपील केले. श्री.गायकवाड यांना त्वरित माहिती द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती फलटण, जि.सातारा यांनी अपिलाच्या सुनावणीनंतर दि.२८.९.२००६ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांना दिले. परंतु आपल्याला अपेक्षित असलेल्या बक्षीसपत्रांच्या नकला मिळालेल्या नाहीत, संमतीपत्रांच्या प्रती देण्यात आल्या आहेत. ही माहिती दिशाभूल करणारी आहे, असे नमूद करुन श्री.गायकवाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण दि.२.८.२००६ रोजी अर्ज केला होता व माहिती सात दिवस उशिरा म्हणजे दि.८.९.२००६ रोजी, (प्रथम अपील केल्यानंतर) देण्यात आली. सार्वजनिक शौचालयासाठी ३२ ग्रामस्थांची जागा ग्रामपंचायतीने घेतली, त्याबाबतच्या बक्षीसपत्रांच्या नकला न देता

संमतीपत्रांच्या नकला दिल्या. यशवंत ग्रामसमृध्दी योजनेत शौचालय बांधताना बरीच कामे अपूर्ण झाली, अनेक तक्रारीही झाल्या. त्यामुळे सर्व कामे कायदेशीर असल्याचे दाखविण्यासाठी खोटी व बनावट कागदपत्रे तयार केली गेली, असा आरोप श्री.गायकवाड यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी केला. परंतु अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.एम.एस.घुले यांनी त्याचा इन्कार केला. बत्तीस ग्रामस्थांची खाजगी जागा ग्रामपंचायतीकडे वर्ग करुन मालकी ग्रामपंचायतीची होण्यासाठी तरडगाव ग्रामपंचायतीने रीतसर बक्षीसपत्र करण्याबाबत दुय्यम निबंधक, फलटण यांच्याकडे विचारणा केली, परंतु गावठाणातील या जागेचे बक्षीसपत्र होत नसल्याचे सांगण्यात आल्यामुळे या बत्तीस ग्रामस्थांनी १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर स्वखुशीने संमतीपत्राद्वारे ग्रामपंचायतीच्या नांवावर जागा करुन दिली. त्याच्या प्रती श्री.गायकवाड यांना देण्यात आल्या आहेत. बक्षीसपत्र झाले नसल्याने बक्षीसपत्रांच्या नकला देणे शक्य नाही, असे श्री.एम.एस.घुले यांनी लेखी व तोंडी नमूद केले. आपल्याला माहिती देतानाच हा लेखी खुलासा करणे आवश्यक होते, असे प्रतिपादन श्री.गायकवाड यांनी केले.

बक्षीसपत्र झाले नसल्यामुळे संमतीपत्राच्या प्रती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. त्या सोबतच बक्षीसपत्र न झाल्याचा स्पष्ट खुलासा केला असता तर ते अधिक नेमके व योग्य ठरले असते. कागदपत्रे तक्रारीनंतर व बनावट अशी केलेली आहेत, असा अपीलकर्त्याचा आरोप असला तरी तो सिध्द करणारे पुरावे ते सादर करु शकलेले नाहीत. तसेच याबाबत शहानिशा करण्यासाठी प्रशासकीय मार्गाने ते तक्रार करु शकतात. उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री.दामाजी बाजीराव चव्हाण यांनी तत्परता दर्शविलेली नाही. सात दिवस विलंबाने माहिती दिली आहे, त्याबद्दल ते शास्तीस पात्र ठरतात.

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी सात दिवस माहिती उशिरा दिलेली आहे. यास्तव प्रतिदिन रु.२५०/- प्रमाणे त्यांना रुपये १७५०/- एवढी शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती ग्रामविकास अधिकारी श्री.दामाजी

बाजीराव चव्हाण यांच्या ऑगस्ट महिन्यात मिळणाऱ्या जुलै महिन्याच्या पगारातून वसूल करुन ती दि.१०.८.२००८ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.एस.एस.घुले यांनी करुन व त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन याचा पूर्तता अहवाल आयोगाला दि.१५.८.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खडपीठ**

**पुणे**
**दि.१०.७.२००८**
**july-०८ solapursangli**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९३ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुधीर माधव जोशी<br>फ्लॅट क्र.१५, इमारत क्र.२, ५८७, दत्तप्रसाद सोसायटी, पुणे सिंहगड रस्ता, पुणे-३० | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी, जनता सहकारी बँक लि., सातारा, जि. सातारा | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जनता सहकारी बँक लि., सातारा, जि. सातारा | हजर |

अपीलकर्त्याने जनता सहकारी बँकेकडे माहितीच्या अधिकारान्वये संगणक व प्रशिक्षण इ. बाबत खर्चाचा तपशील मागितला होता.

नागरी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नसल्याचे प्रतिपादन श्री. दि.ना.कळमकर, जनता सहकारी बँक लि., सातारा यांनी विशेष अपील निर्गत कार्यक्रमात लेखी केले. नागरी सहकारी बँका माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येतात की नाही, याबाबत न्यायालयीन बाबींमुळे तूर्त 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचा आयोगाचा निर्णय असल्यामुळे बँकेचे म्हणणे मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ७ .७.२००८

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. नामदेव शामराव नालंदे<br>व्हिल कॉलनी, बारामती, जि. पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | कार्यकारी संचालक,<br>दि माळेगाव सहकारी साखर कारखाना लि.,<br>शिवनगर, ता. बारामती, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रादेशिक सह संचालक (साखर),<br>साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ | हजर |

अपीलकर्त्याने सन २००३ ते २००७ या कालावधीतील दि माळेगाव सहकारी साखर कारखाना लि., शिवनगर येथील पदाधिकाऱ्यांचा प्रवासभत्ता, वाहन खर्च इ. संबंधी विशिष्ट तक्त्यात माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती तयार असल्याचे व त्याचे शुल्क रू.७४२०/- भरण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. त्यावर अपीलकर्त्याने माहिती पाहण्यासाठी वेळ मिळावा व तद्नंतर आवश्यक तेवढीच माहिती शुल्क भरून घ्यावयाची असल्याचे कळविले व निर्धारित वेळेत आपण वेळ न दिल्यास अपील केले जाईल, असे उत्तर दिले. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे यांचेकडे मार्गदर्शन मागविले. दरम्यान अपीलकर्त्याने सहसंचालक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्यास सुनावणी न देता शुल्क भरून माहिती घेऊन जाण्याबाबत अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास पत्र दिले. त्यावर अपीलकर्त्याने आयोगाकडे अपील केले आहे.

११.६.०८

उपलब्ध सर्व कागदपत्रे, पत्रव्यवहार पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या मागणी प्रमाणे माहिती तयार केल्यानंतर शुल्कासंबंधी पत्रव्यवहार केला आहे. त्यावर, शुल्क न भरता माहिती पाहण्याची मागणी करणे, प्रथम अपील करणे या बाबी या अपीलकर्त्याच्या माहिती मागण्याविषयीच्या गांभीर्याबाबत प्रश्नचिन्ह उभे करणाऱ्या आहेत. अभिलेख अवलोकनाची मागणी मूळ अर्जातच करावयास हवी होती, तसेच 'आवश्यक तेवढीच माहिती' मुळातच मागणे आवश्यक होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याने पूर्ण शुल्क भरुन माहिती प्राप्त करून घ्यावी.

पुणे
दि. ०४.७.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७०२ + ७०३ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | शामसुंदर बेजनाथ खत्री<br>संपादक खरी खबर, अशोकनगर, रो हाऊस नं. १६<br>वाघोलीकर पार्क, बारामती, पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | कार्यकारी संचालक, माळेगाव सहकारी साखर कारखाना लि., शिवनगर, ता.बारामती, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रादेशिक संचालक (साखर), साखरसंकुल, शिवाजीनगर, जि. पुणे ५ | हजर |

अपीलकर्त्याने दि. २१.११.२००६ व दि. १०.१२.२००६ रोजी दोन स्वतंत्र अर्ज करून जन माहिती अधिकारी, माळेगाव सहकारी साखर कारखाना लि. शिवनगर, ता.बारामती यांचेकडे अनुक्रमे कार्यकारी संचालक, कार्यालय अधीक्षक यांचे पदांच्या नेमणूकी संबंधात शैक्षणिक पात्रता, अनुभव इ. पाच मुद्दयांवर तसेच प्रभारी कार्यकारी संचालक यांचे नेमणूकी संबंधी पाच मुद्दयांवर माहिती मागितली होती.

सर्व कागदपत्रांचे अवलोकन करता माहिती अपीलकर्त्यास देण्यात आल्याचे दिसून येते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ०४.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**


राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१


राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७०८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. ज्ञानदेव बापूराव वामन<br>मु.पो. काळवाडी, ता.जुन्नर, जि. पुणे-४१२४१२ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | विस्तार अधिकारी ( पंचायत)<br>पंचायत समिती, जुन्नर, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जुन्नर,<br>ता. जुन्नर, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. ज्ञानदेव बापूराव वामन यांनी प्रशासकीय नियमांची माहिती मागितली होती.

प्रस्तुत अपिलाची कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उशिरा दिली असल्याचे आढळून येते. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्याचे निधन झाले असल्याचे नमूद करून त्यांच्या मृत्यू दाखल्याची प्रत आयोगाला सादर केली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, जुन्नर यांना समज देण्यात येत आहे.

पुणे
दि. २९ .७.२००८

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७११ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. संपत भोजराज नहार<br>मुंबई बाजार, घर क्र. ३५३५, घोडनदी,<br>ता. शिरूर, जि. पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, शिरूर, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, पुणे | हजर |

अपीलकर्त्याने मर्चंट नागरी सहकारी पतसंस्था मर्या., शिरूर या संस्थेसंदर्भात अनेक प्रश्न विचारून त्याच्या खुलाशाची मागणी केली होती. त्यामध्ये काही कागदपत्रांच्या प्रतींचीही मागणी होती.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने प्रथम अपिलामध्ये अपिलीय प्राधिकारी यांनी निःशुल्क माहिती देण्याचे आदेश दिले. त्यानुसार दि. ८.३.२००७ रोजी उपलब्ध सर्व माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, शिरूर यांनी नमूद केले.

सर्व कागदपत्रे, पत्रव्यवहार व अपीलकर्त्याचा मूळ अर्ज पाहता पुढील बाबी निदर्शनास येतात : अपीलकर्त्यास उपलब्ध ती सर्व माहिती देण्यात आली आहे. मात्र त्यांच्या मूळ अर्जात कार्यवाही होण्याविषयी मागणी केल्याचे किंवा झालेल्या कार्यवाहीची कारणे व त्याची जबाबदारी कोणाची, अशा स्वरूपाचे प्रश्न विचारल्याचे दिसते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत अशी मागणी बसत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ७.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सत्वशील धैर्यशील शेळके
मु.पो.लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार खंडाळा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
खंडाळा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२ / सातारा / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सत्वशील धैर्यशील शेळके
मु.पो.लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार खंडाळा, जि.सातारा श्री.जी.एस.सांगडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | प्रथम अपील केलेले नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा येथील स.नं.२७९/२/२ च्या ७/१२ उता-यात वेळोवेळी

| | |
|---|---|
| | गावकामगार तलाठी यांच्या मर्जीप्रमाणे बदल केलेला दिसून येत आहे तो कसा याचा खुलासा व्हावा व याची माहिती लेखी व स्पष्ट स्वरुपात मिळावी. हे फरक असलेले ७/१२ उतारे देण्याचा उद्देश काय याबाबतची माहिती मिळण्याबाबत |

## विवेचन

मौजे लोणंद, ता.खंडाळा, जि. सातारा येथील स.नं.२७९/२/२ च्या ७/१२ उताऱ्यात गावकामगार तलाठ्याने अनेकदा केलेले बदल, जिल्हाधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सातारा यांचे नाव फेरफारात लागणे आदि संदर्भात अपीलकर्ता श्री.सत्वशील धैर्यशील शेळके यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खंडाळा यांच्याकडे माहिती मागितली होती. एकाच जागेचे वेगवेगळ्या नोंदी असलेले उतारे भिन्न व्यक्तींना दिले गेले असल्याच्या पार्श्वभूमीवर श्री.शेळके यांनी माहिती मागणीच्या अर्जात अनेक बाबींचा खुलासा विचारला आहे. ती माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात नसल्यामुळे देता येणार नाही व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये खुलासा विचारता येणार नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अपील न करता श्री.शेळके यांनी थेट राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

स.नं.२७९/२/२ व स.नं.२७९/२अ/१ याबाबत श्री.शेळके सातत्याने अर्ज, तक्रारी व अन्य पत्रव्यवहार करीत आले आहेत. श्री.शेळके यांनी सन २००६ मध्ये १८ व सन २००७ मध्ये २८ असे एकूण ४६ अर्ज या संदर्भात केले आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांनी आयोगापुढील सुनावणीत पूरक कागदपत्रांसह तपशीलवार लेखी व तोंडी नमूद केले.

आपल्याला व श्री.मधुकर तात्याबा गोळे यांना एकाच जमिनीचे वेगवेगळ्या तारखांचे वेगवेगळ्या नोंदी असलेले उतारे गावकामगार तलाठ्यांनी दिले. त्यांनी जाणीवपूर्वक खोटी कागदपत्रे तयार करुन ७/१२ सदरी बदल केले, हा श्री.शेळके यांचा मुख्य आक्षेप आहे. पूरक कागदपत्रांसह त्यांनी हे लेखी व तोंडी स्पष्ट केले. असा फरक असलेले उतारे देण्याचा उद्देश काय, अशासारखे प्रश्न श्री.शेळके यांनी अर्जात विचारले आहेत. अशा प्रकारची भाष्याची मागणी, तसेच गावकामगार तलाठी यांच्या मर्जीप्रमाणे बदल कसा केला याचा खुलासा करावा, अशा स्वरुपाची खुलाशाची मागणी माहितीच्या अधिकारात करता येणार नाही, हे जन माहिती

अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.समीर शेरखाने यांनी माहिती न देण्याबाबत दिलेले कारण अशा स्वरुपाच्या विचारणेबाबतच मर्यादित मानावे लागेल. एकाच विषयाच्या, एकाच संदर्भातील व एकाच परिस्थितीतील माहितीच्या तपशिलात भिन्नता असेल; त्यात मूळ माहितीचा विपर्यास करणारे बदल केले गेले असतील तर हे कसे झाले हे जाणून घेणे हा नागरिकाचा हक्क आहे. त्यामुळे श्री.शेळके याना बदलाबाबतच्या वस्तुस्थितीची स्पष्ट माहिती दिली गेली पाहिजे.

या बदलाच्या संदर्भात श्री.शेळके यांनी उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई यांच्याकडे तक्रार अर्ज केला होता. त्यानुसार त्यांनी चौकशी करुन गावकामगार तलाठी श्री.के.पी.शेंडे यांना 'निष्काळजीपणा केल्याबद्दल सक्त ताकीद देऊन त्याची नोंद सेवापुस्तकात करण्याची कारवाई ' केली, असे तहसीलदार श्री.जी.एस.सांगडे यांनी दि.१५.११.२००७ व दि.१६.१.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. '७/१२ सदरी बदल केला असला तरी ७/१२ वरील बदल व मूळ ७/१२ पाहता फरक पडत नाही', असे तहसीलदार श्री.जी.एस.सांगडे यांनी या निवेदनात म्हटले आहे. मूळ परिस्थितीत फरक पडतो की नाही, एवढ्यापुरतेच त्याकडे पाहणे योग्य नाही. मूळ अभिलेखात नसलेल्या माहितीचा समावेश करणे, पर्यायाने वास्तव माहितीचा विपर्यास करणे व त्यायोगे दिशाभूल करणारी माहिती देण्यास कारणीभूत ठरणे अशी ही कृती असून ती गंभीर आहे. तो करणाऱ्या कर्मचाऱ्यास केवळ 'सक्त ताकीद' एवढी कारवाई पुरेशी नाही. उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई, जि.सातारा यांनी दिलेले दि.१३.८.२००७ चे ज्ञापन पाहता तलाठी यांच्यावरील आरोप सिध्द झाल्याचे दिसून येते. असे असताना गाव कामगार तलाठी यांना इतकी सौम्य शिक्षा देण्याचे प्रयोजन स्पष्ट होत नाही. वास्तविक या गंभीर बाबीसाठी गावकामगार तलाठी श्री.के.पी.शेंडे यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करणे योग्य ठरले असते. मूळ माहिती अनधिकाराने बदलणे, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती जाणीवपूर्वक देणे ही गंभीर बाब असून त्याबद्दल संबंधितावर कडक कारवाई होणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.सुनील शेरखाने यांनी अधिक गांभीर्याने या विषयाची दखल घेऊन माहिती द्यावयास हवी होती. तरतुदींचा अर्थ लावताना मूळ कायद्याचा गाभाभूत आशय व त्यातील तत्त्व लक्षात घेणे आवश्यक आहे, याची जाणीव त्यांना देण्यात येत आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) मूळ माहिती अनधिकाराने बदलून दिशाभूल करण्याबद्दल श्री.के.पी.शेंडे, गावकामगार तलाठी, मौजे लोणंद यांच्यावर त्यांना लागू असलेल्या सेवानियमांन्वये शिस्तभंगाची कारवाई करुन उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई, जि. सातारा यांनी त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला दि.१५.८.२००८ पर्यंत सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १८.७.२००८

july-०८ solapursangli५६-५९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३८ + ७४४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.व्ही.पी.सहस्त्रबुध्दे<br>६, यशवंत अपार्टमेंट, २६५ए, शनिवार पेठ, पुणे-३० | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., शिवाजीनगर विभाग, पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., शिवाजीनगर विभाग, पुणे | हजर |

श्री सम्मतानगर सहकारी पतसंस्था मर्यादित, यांना बिलांवर पाच रूपये सेवाशुल्क आकारण्यास प्राधिकृत केले आहे किंवा कसे, तसेच याबाबत नियम /आदेश याची माहिती अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., शिवाजीनगर विभाग, पुणे यांचेकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती दिली असून आपली तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याने दि. १०.६.२००८ च्या पत्रान्वये नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश** .

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २.७.२००८**

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २५.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८६ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. राजेश सुदाम भुजबळ<br>मु.पो.हिराई निवास, भुजबळ वस्ती, सावतामाळी मंदिराजवळ, वाकड, ता.मुळशी, जि. पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखा परिक्षण), पुणे विभाग, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखा परिक्षण), पुणे विभाग, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. राजेश सुदाम भुजबळ यांनी अनुशेष विशेष मोहीम अंतर्गत निवड होऊनही नियुक्ती का दिली नाही, कोणत्या शासन निर्णय / परिपत्रका आधारे ही कार्यवाही केली, या संबंधी माहिती मागितली होती.

दि. १५.३.२००७ रोजी माहिती पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. प्रथम अपील सुनावणी दरम्यान पुनश्च माहिती उपलब्ध करुन दिल्याचेही अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निकालपत्रात नोंदविले आहे. अपीलकर्त्यांचे समाधान झाल्याने प्रथम अपील त्यांनी मागे घेतल्याचे लेखी दिले आहे, असे अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १५.१२.२००७ च्या अहवालान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30.६.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

१२.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३५ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. वसंतराव आबासाहेब गरड<br>प्लॉट क्र.३४, सर्व्हे क्र.४७, विवेकनगर,<br>आकुर्डी, पुणे- ४११ ०३५ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच,<br>कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच,<br>कोल्हापूर | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. वसंतराव आबासाहेब गरड, भुदरगड नागरी सहकारी पतसंस्था, मर्या., गारगोटी, जि. कोल्हापूर यांच्याविरूध्द दाखल केलेल्या ग्राहक वसुली केस नं.६९/०४ च्या अनुषंगाने माहिती मागितली होती.

विशेष अपील निर्गत कार्यक्रमास जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर हे उपस्थित होते. माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करून दिलेली आहे. दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याचे निधन झाले आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी निवेदनात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १४.७.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

१२.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती एस.एस.नवले
३/२४९, लेन नं.६, सातव प्लॉट,
बनकर कॉलनी, आकाशवाणी, हडपसर, पुणे-४११०२८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
४३६, सोमवार पेठ, जिल्हा परिषद इमारत, पुणे ४११००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३७+५३०+६२७ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती एस.एस.नवले
३/२४९, लेन नं.६, सातव प्लॉट,
बनकर कॉलनी, आकाशवाणी, हडपसर, पुणे-४११०२८

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
४३६, सोमवार पेठ, जिल्हा परिषद इमारत, पुणे ४११००२

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.३.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.६.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.एन.एस.नवले, विस्तार अधिकारी (उद्योग) यांच्या दि.२९.१.२००६ च्या एकतर्फी कार्यमुक्ती आदेशाबाबत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे यांच्याकडून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे याना सादर करण्यात आलेल्या टिपणीची छायांकित प्रत. गटविकास अधिकारी, मावळ याचे पत्र क्र.वशी/५७३/१९९, दि.१०.७.१९९८ ची प्रत. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचे पत्र क्र.जिग्राविय‍ं/आस्था/४४१७/२००५, दि.४.८.२००५ च्या पत्राची छायांकित प्रत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्रीमती एस.एस.नवले यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडे श्री.एन.एस.नवले यांच्या कार्यमुक्तीच्या संदर्भात माहिती मागणारे अर्ज दाखल केले होते. प्रत्येक अर्जावर जन माहिती अधिकारी यानी त्यांना खुलासेवजा पत्र देऊन उत्तर दिले. त्यावर व्यथित होऊन श्रीमती एस.एस.नवले यानी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे एकूण आठ अपिले दाखल केली. माहितीच्या अधिकारात कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्याची मागणी करता येणार नाही, असे दि.२७.६.२००६ रोजी सुनावणीनंतर अपिलीय प्राधिकारी यांनी आदेशात नमूद करुन सर्व अपिले निकाली काढली. मात्र आपल्याला दिलेली माहिती चुकीची, अपुरी व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद करुन श्रीमती नवले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत.

प्रॉव्हिडंट फंड खाते उघडणे, संगणक विषयक प्रशिक्षण, सेवा बाबी विषयांतर्गत जिल्हा प्रकल्प अधिकारी यांनी बोलाविलेल्या दि.१.८.२००२ ते १९.१२.२००५ या कालावधीमध्ये झालेल्या आढावा सभा व इतर सभा, सदर सभांना पंचायत समिती, शिरुर येथील कोण हजर रहात होते याची तारखेनुसार माहिती, तसेच शिरुर पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यांच्या सह्या असलेल्या हजेरीपत्रकाची छायांकित प्रत, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे येथील

सेवेच्या नोंदी सेवापुस्तकात घेणे, १.१.१९९६ पासूनचा योग्य त्या कालावधीपर्यंतचा पाचव्या वेतन आयोगाचा फरक देणे, रजेचा प्रस्ताव मूळ कार्यालयाला पाठवून रजेविषयी नोंदी सेवा पुस्तकात करणे, वेतन निश्चिती करुन फरक देणे इत्यादी मागण्या श्रीमती नवले यांनी विविध अर्जाद्वारे केल्या असून त्या त्या वेळी माहिती मागणीच्या अर्जानुसार त्यांना माहिती देण्यात आली आहे, परंतु त्यांच्या मागण्यांचा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून त्यांच्या मुख्य मागण्या या श्री.एन.एस.नवले यांच्या बदलीसंबंधी आहेत. श्री.नवले यांचे भविष्य निर्वाह निधी खाते उघडण्यासंबंधी वेळीच कार्यवाही का झाली नाही किंवा ती कुणी करणे अपेक्षित आहे, असे खुलासेही त्यांनी विचारले आहेत. हा भाग माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. मात्र दि.२७.६.२००६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या बैठकीच्या इतिवृत्तासारखी माहिती त्यांना दिली गेली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्याला त्वरित निःशुल्क देण्याचे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी लेखाधिकारी श्री.विकास खामकर यांना दिले होते, सदरची माहिती दिली नसल्यास ती निःशुल्क देऊन त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला आठ दिवसात अपिलीय प्राधिकारी यांच्यातर्फे उपस्थित असलेले प्रतिनिधी श्री.खामकर यांनी सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १९.७.२००८
july-०८ solapursangli५४-५६

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४६ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. राजेंद्र जगन्नाथ खरात<br>ब, १००/४, गव्हर्नमेंट कॉलनी, बांद्रा ( पूर्व )<br>मुंबई - ४०० ०५१ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आर्वी<br>ता. जुन्नर, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय अधिकारी | गट विकास अधिकारी<br>पंचायत समिती, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. राजेंद्र जगन्नाथ खरात यांनी मौजे आर्वी या गावातील दलित वस्ती, माळवाडी येथील पाणी पुरवठ्याबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आर्वी यांनी माहिती दिली. परंतु अपीलकर्त्यांची मूळ मागणी पाणी पुरवठा करण्याची आहे.

या गावाच्या पाणी पुरवठ्याकरिता एकूण २४.५ लाख रूपयांची योजना प्रस्तावित असल्याचे वरील घटकांमधील चर्चेच्या वेळेस अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सांगितले. मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाही करण्याची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 23.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६२ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिनदयाळ हिराचंद वाधवानी<br>मार्केटयार्ड, मु. पो. ता. चिखली, जि. बुलढाणा | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सचीव, कृषि उत्पन्न बाजार समिती, ता.चिखली, जि. बुलढणा | हजर |
| ४ | अपिलीय अधिकारी | सहाय्यक उपसंचालक (पणन)<br>पणन संचालनालय, पुणे-१ | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. दिनदयाळ हिराचंद वाधवानी यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती, चिखली, जि. बुलढाणा या संस्थेच्या गैरव्यवहारा संबंधात एकूण तीन मुद्दयांची माहिती मागितली होती.

आपल्याला माहिती मिळाली असल्याने कोणतीही तक्रार राहिली नाही, असे दि. २४.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपीलकर्त्याने जिल्हा उपनिबंधक, यांना कळविले आहे. या पत्राच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (पणन) यांनी दि. २७.६.२००८ रोजी निवेदनाद्वारे आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २४.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

११.६.०८

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. प्रेम शेट्टी<br>प्लॉट नं.२, सनराईज को.ऑप.हौ. सोसायटी लि.,<br>लुल्लानगर, पुणे-४११ ०३७ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१), पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. प्रेम शेट्टी यांनी सनराईज को.ऑप. हौसिंग सोसायटी लि., संदर्भात विविध मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांनी संस्थेसंदर्भातील कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली असल्याचे नमूद केले. तसेच संस्थेस शासनाचे कोणतेही अर्थसहाय्य नसल्याने त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू नसल्याचे प्रतिपादन केले. लेखापरीक्षण अहवाल व नियमावली उपलब्ध करून देण्याचे लेखी नमूद केले. पंधरा दिवसांत उर्वरित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले. अपीलकर्त्याने त्याला मान्यता दिली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी उर्वरित माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क देऊन हा आदेश प्राप्त झाल्या दिनांकापासून [illegible] दिवसांत पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. 30.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

१२.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम', दि. २४.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. बाबुराव धोंडीबा पवार<br>मु.पो.नाझरे कॉलनी नजीक, पवार वस्ती (जेजुरी)<br>ता. पुरंदर, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, सासवड, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, सासवड, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. बाबुराव धोंडीबा पवार यांनी दि. २०.१०.२००७ च्या अर्जान्वये तहसीलदारांसमक्ष दि. १४.१०.१९८६ व दि. २१.९.१९८८ रोजी झालेल्या जमीन वाटपामधील प्रकरणातील जबाबांच्या नकला मागितल्या होत्या.

कागदपत्रे आढळ होत नसल्याने अर्ज निकाली काढला असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुरंदर यांनी अपिलामध्ये दि. ३.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये अभिलेख उपलब्ध होत नसल्याने माहिती देता येत नसल्याचा निर्णय दिला.

याबाबत न्यायालयात दावा चालू असून तहसीलदार यांनी न्यायालयात समक्ष हजर राहून माहिती उपलब्ध नसल्याबाबत जबाब द्यावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री. पवार यांनी केली. न्यायालयाचे समन्स आल्यावर समक्ष हजर राहून जबाब देण्याचे तहसीलदार, पुरंदर श्री. [illegible] यांनी मान्य केले. मात्र ही बाब स्वतंत्र असून 'माहिती' ला पर्याय ठरू शकत नाही. सबब आदेश जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना देण्यात येत आहे.

२४.६.०८

जमीनविषयक अभिलेखांबाबतची पुरंदर तहसील कार्यालयातील व्यवस्था योग्य नसलयाचे या विषयातून स्पष्ट होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अभिलेख उपलब्ध होत नसल्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी संबंधितांची चौकशी करावी व दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी. याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, पुणे यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांत सादर करावा.

पुणे
दि. 30.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

प्रत : जिल्हाधिकारी, पुणे यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अप्पासाहेब महादेव लोखंडे
मु.पो.ढवळ, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, फलटण, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
ढवळ कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी मर्यादित, ता.फलटण, जिं.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४ / सातारा / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, फलटण, जि. सातारा श्री.एस.जी.गावडे

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, ढवळ कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी मर्यादित,
ता.फलटण, जि.सातारा श्री.नानासाहेब गोविंद गोफणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.७.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मार्केटयार्ड , फलटण येथील संस्थेच्या गाळ्यांचा भाडेपट्ट्याचा तपशील. गाळ्यांच्या भाड्यापोटी इतर संस्थांकडून मिळालेल्या भाडेपट्ट्याच्या पावत्या, जमाखर्च, सन २००१-२००६ मधील सर्व सभासदांची तारखासह यादी, संस्थेचे कार्यक्षेत्र, सभासद करणेसाठी व कर्ज | |

| | |
|---|---|
| | वाटप करणेसाठी असलेले कार्यक्षेत्र, तसेच दाख... ठरावाने व कोणत्या तारखांना वाटले, संस्थेमार्फत चाराछावणीचा पूर्ण जमाख... ...लेखापरीक्षण अहवाल, एकूण जनावरे लहन-मोठी, घेतलेला चारा, वहातुकीस लागलेला खर्च, वाहतुकीसाठी लावलेल्या वाहनांचे नंबरसह जमाखर्च, तपशील व किती शासकीय अनुदान मिळाले. चालू संचालक मंडळाच्या वार्षिक व मासिक मिटिंगचा तपशील मिळणेबाबतची नक्कल. |

## विवेचन

मार्केटयार्ड फलटण येथील संस्थेच्या गाळ्यांच्या भाडेपट्ट्याचा तपशील, संस्थेमार्फत चालविलेल्या चाराछावणीचा जमाखर्च इ. पाच मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री.अप्पासाहेब महादेव लोखंडे यांनी जन माहिती अधिकारी तथा सचीव, ढवळ कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी मर्यादित, फलटण, जि.सातारा यांच्याकडे मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचीव, ढवळ कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी मर्यादित, फलटण, जि.सातारा श्री.सतीश सोनबा बागल यांनी माहिती दिली नाही. श्री.लोखंडे यांनी स्मरणपत्रे पाठवूनही श्री.बागल यांनी माहिती देण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यांनी सातत्याने चालढकल केल्याचे नमूद करुन श्री.लोखंडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, फलटण, जि.सातारा यांच्याकडे अपील केले. अपिलाच्या सुनावणीला श्री.बागल उपस्थित राहिले नाहीत. पंधरा दिवसात माहिती देण्याचे आदेश देऊन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील मंजूर केले. तरीही माहिती न मिळाल्यामुळे श्री.लोखंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण दि.२४.३.२००६ रोजी मूळ अर्ज केला होता. श्री.बागल यांना अनेकदा समक्ष भेटून व पत्राद्वारे स्मरण दिले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही आपण अनेकदा भेट घेऊन व पत्राद्वारे स्मरण दिल्यानंतरही त्यांनी माहिती दिली नाही. मूळ कागदपत्रांमध्ये बदल करण्याची व पर्यायाने संस्थेचे नुकसान होण्याची त्यात शक्यता आहे, असे श्री.लोखंडे यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलात म्हटले आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सतीश सोनबा बागल यांची दि.१९.५.२००७ रोजी बदली झाली व सध्या ते बेपत्ता आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, फलटण, जि.सातारा श्री.एस.जी.गावडे यांनी सांगितले. श्री.बागल

यांच्या बदलीनंतर आपण त्या पदावर काम करीत असून आधीची कोणतीही माहिती त्यांनी आपल्याला दिली नव्हती, त्यामुळे या अपिलाबाबत आयोगाकडून दि.५.१.२००८ रोजी विचारणा करणारे पत्र आल्यानंतर आपल्याला हा विषय कळला व आपण तातडीने कार्यवाही करुन दि.११.१.२००८ रोजी सर्व माहिती श्री.लोखंडे यांना दिली, असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.नानासाहेब गोविंद गोफणे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री.लोखंडे यांना दिलेल्या माहितीच्या प्रती त्यांनी सोबत सादर केल्या.

एकूण कागदपत्रे व विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची निवेदने लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सतीश सोनबा बागल यांनी माहिती-मागणीच्या अर्जाची कोणतीही दखल घेतलेली नाही, अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशाचे पालनही त्यांनी केलेले नाही. एकुणात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ बाबत पूर्णपणे बेफिकीरी दर्शविली आहे. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) जन माहिती अधिकारी तथा सचीव, ढवळ कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी मर्यादित,फलटण, जि.सातारा श्री.सतीश सोनबा बागल यांना २५००० रुपये शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती त्यांच्या ऑगस्ट महिन्यापासून मिळणाऱ्या (जुलै महिन्यापासूनच्या) वेतनातून वसूल करुन तीन हप्त्यात दि.१०.९.२००८ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, फलटण, जि.सातारा श्री.एस.जी.गावडे यांनी करुन व त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन याचा पूर्तता अहवाल आयोगाला दि.१५.१०.२००८ पर्यंत सादर करावा. श्री.बागल सेवेतून मुक्त असल्यास त्यांच्या देय रकमातून एकरकमी अथवा सेवानिवृत्तीवेतनातून तीन हप्त्यात ही रक्कम वसूल करावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
दि.७.७.२००८
july-०८ solapursangli२९-३१

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८६ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. प्रभाकर मारूती काकडे<br>सरस्वती, १४, सागर सोसायटी,<br>सहकारनगर क्र.२, पुणे-४११ ००९ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी अधिकारी<br>कृषी भवन, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,<br>कृषि भवन, पुणे-५ | हजर |

अपीलकर्ता श्री. प्रभाकर मारूती काकडे यांनी श्री. सुनिल प्रभाकर काकडे यांच्या सेवाविषयक बाबी संबंधात एकूण सहा मुद्दयांबाबत माहिती मागितली होती.

आपणास हवी असलेली माहिती उपलब्ध झालेली असल्याने कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्त्याने दि. २४.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** २१.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

११.६.०८